Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2410III02V12P0010

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–III(II), Volume–XII

# पहिल्या महिला ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त बंगाली लेखिका : आशापूर्णादेवी (१९०९-१९९५)

**Dr. Anjali Anand Choure**
Email : badweanjali@gmail.com
Librarian, Uma Mahavidyalaya, Pandharpur

**सारांश -**

परिस्थितीपुढे शरणागती न पत्करता स्वत:च्या हिंमतीवर मानाने उभ्या राहणार्या व अभिमानाचा लवलेरधि नसणाऱ्या अशा अतिशय विनम्र लेखिकेचा परिचय आहेत् परंतु त्यांच्या साहित्याचा नव्या दृष्टीकोनातून अभ्यास व्हावा या दृष्टीने ही माहिती दिली आहे.

**बीज शब्द-**

ज्ञानपीठ, साहित्य अकादमी, समीक्षक

**प्रस्तावना -**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या प्रथम महिला लेखिका म्हणून ज्या प्रसिद्ध आहे त्यांच्याविषयी माहिती मिळावी, या उद्देशाने हा पेपर लिहिण्याचा उद्देश आहे

त्या बांगलादेशात लिखाण करणार्या साहित्यकार होत्या. त्यांच्या प्रतिशृति या कादंबरीसाठी ह्यांना इ.स. १९७६ सालचा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला होता् त्यांना साहित्य व शिक्षणातील पद्मश्री पुरस्कारही मिळाला होता व त्यांना साहित्य अकादमीची फेलोशिपही सन १९९४ साली मिळाली होती.

**उद्दिष्टे -**

1. भारतातील पहिल्या महिला ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त लेखिकेचा शोध घेणे
2. त्यांची चारित्र्य विषयक माहिती मिळवणे,
3. त्यांच्या साहित्याचा थोडक्यात परिचय करून देणे.

**स्पष्टीकरण-**

आशापूर्णादेवींना १९७७ साली ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आणि अवघ्या साहित्य विश्वाचे लक्ष त्यांनी वेधून घेतले. बंगाली भाषेतले हे तिसरे आणि एका भारतीय महिलेला मिळालेला पहिला पुरस्कार होता.

आशापूर्णादेवी या लेखिकेचं नाव बंगाली वाचकांमध्ये, समीक्षकांमध्ये, साहित्यिकांमध्ये अतिशय आदराने घेतले जाते. आशापूर्णादेवींनी अमाप साहित्य लिहिले. कथा तर हजारोंच्यावर, पुस्तकांची संख्या दोनशेच्यावर. त्यांच्या अनेक कथांवर चित्रपट निघाले.

'प्रथम प्रतिश्रुति' ही कांदबरी प्रसिद्ध झाली. तसंच पाठोपाठ 'सुवर्णलता' आणि 'बकुळकथा' या तीन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. या कादंबऱ्या तीन पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. या कादंबऱ्या आणि लेखिकेची लेखनशैली, त्यांच्या विचारांची बैठक, संस्कार या सर्वांचाच विचार करायला हवा.

ही लेखिका औपचारिकपणे कुठल्याही शाळेत गेली नाही. कोणत्याही शैक्षणिक पदव्या नावापुढे नाहीत. तरीही ... स्वप्रज्ञा, स्वप्रतिभा आणि लिहिण्यासाठी सदैव तत्पर असलेले हात या सर्वांच्या रसायनातून एक अलौकिक गुणवत्ता लाभलेली लेखिका साहित्याच्या दरबारात दाखल झाली.

संयुक्त कुटुंब तेही मध्यमवर्गीय, रूढीप्रिय त्यामुळे मुलींच्या शिक्षणाचा प्रश्नच उद्भवत नव्हता परंतु, आशापूर्णादेवींची आई थोडे शिकलेली आणि वाचनाच अतोनात आवड असलेली होती. त्यांनी आपल्या माहेराहून ट्रकभरून पुस्तक आणली होती. त्यामुळं आईची इच्छा होतीच लेकीनं शिकावं पण, सासरचं वातावरण! आशापूणार्देवींचे वडिल कमर्शियल आर्टीस्ट होते.

लहानग्या आशाने शिकायची एक नवीनच युक्ती शोधून काढली. मोठे दोन भाऊ अभ्यासाला बसले की, ही मुलगी तिथचं खेळत रहायची. समोर बसून भाऊ वाचायला लागला की, त्यांच्या तोंडाकडे बघून आशापूर्णादेवीने उच्चार ऐकायचे आणि पुस्तकात त्याने बोट ठेवलेले अक्षर बघायचे असे करता करता ती उलटं वाचायला शिकली.

लवकरच वडिलांना लक्षात आले ही मुलगी बुद्धिमान आहे. हिला शिकविलचे पाहिजे. आशापूर्णादेवीची आई त्यांना लहानपणी खिडकीत बसवून बांधून ठेवी आणि काम करी. तेव्हा आशापूर्णा 'खेला खेला' म्हणत उड्या मारायच्या आणि हेच 'खेला खेला' पुढे 'लेखा लेखा' झाले.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2410III02V12P0010
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–III(II), Volume–XII

आशापूर्णादेवींनी पहिली कविता अवघ्या बाराव्या वर्षी लिहिली आणि ती त्यावेळच्या 'शिशूसाथीत' या मासिकात प्रसिद्ध झाली. त्यांनतर पंधराव्या वर्षी त्यांना एक पुरस्कार मिळाला पण, प्रामाणिक आशाने लगेच संपादकांना पत्र पाठवून म्हटले की, कविता पाठवली तेव्हा मी पंधराच्या आत होते आणि आता पंधरा पूर्ण झालेली आहेत, तर हा पुरस्कार दुसऱ्याला द्यावा. हा प्रामाणिकपणा बघून संपादक घरी आले. त्यांनी पुरस्कार तर दिलाच शिवाय आणखी एक बक्षीस दिले. इथून सुरु झाला लेखनाचा प्रवास. फक्त छोट्यांसाठी तो, वयाच्या २८ व्या वर्षापर्यंत चालू होता. सर्वच क्षेत्रात स्त्रियांना अधिकारांपासून वंचित कां ठेवले? स्त्री नेहमीच अन्याय आणि शिक्षा या जात्यात भरडली जाते, कां? तिचे जीवन कायम विरोध आणि अडथळ्यांनीच भरलेले असे का? इत्यादी. प्रश्नांनी मला आयुष्यभर छळले. हा कॅनो?' (का?) मला पुरुन उरला.

त्यांच्या कादंबऱ्यांचा सारांश : त्यांच्या पुढील तीन प्रसिद्ध कादंबऱ्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

'प्रथम प्रतिश्रृति' हे म्हणजे शंभर वर्षांपूर्वीच्या समाजातून आलेल्या स्त्रीला दिलेलं 'पहिले वचन'. स्वतंत्रपणे उचललेलं पहिले पाऊल. 'सुवर्णलता' आणि 'बकुळकथा' तीन कादंबऱ्या तीन पिढ्यांची प्रतिनिधित्व करतात.

मूळ बंगालीतील 'प्रथम प्रतिश्रुति' ही कादंबरी बरीच मोठी. जवळपास सातशे पृष्ठांची आहे. ज्ञानपीठ मिळाल्यावर या कादंबरीचा अनुवाद केला. तो १९८० साली प्रसिद्ध झाला. 'प्रथम प्रतिश्रुति' ची नायिका सत्यवती अतिशय जिद्दी, कणखर, धीट, परखड विचारांची, दृढस्वभावाची आहे. चांगल्या गोष्टीसाठी वाटेल तो त्याग करण्याची तिची तयारी असते. त्यासाठी कष्ट करण्याची तिची तयारी असते. चुकीच्या वाटलेल्या गोष्टी, अंधश्रद्धा वगैरेची ती खिल्ली उडवते. सत्यवती नावाप्रमाणचं सत्यवादी विचारांची आहे. ती हार पत्करत नाही. सत्याचा पाठपुरावा करणारी जे चूक आहे ते चुकच. मग ते नवऱ्याचे वागणे असो की सासऱ्याचे. तिथेही ती ठाम असते.

बकुलच्या कथनातून बकुल पहिल्याच पृष्ठावर म्हणते, 'माझ्यावर लिहायचं तर आज नको. आधी आजी, पणजीच्या ऋणातून मुक्त होऊ दे मला.'कारण, ओसाड गावात लपलेले, अदृश्य असणारे कोरडे नाले पावसाच्या पाण्यानं भरतात नि खळाळत नदीच्या पाण्यात जाऊन प्रवाहरूप बनतात. जोराने वाहतात. म मग हाच प्रवाह पुढे वेगानं दौडत जाऊन समुद्राशी एकरूप होतो.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2410III02V12P0010
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–III(II), Volume–XII

वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी त्यांच्या इच्छेप्रमाणे कलकत्यातच जगाचा निरोप घेतला! आजही त्यांचे साहित्य तितक्याच आवडीने वाचक वाचतात.

**निष्कर्ष** -

अन्नपूर्णा देवी यांनी अत्यंत खडतर परिस्थितीत आपली लेखन साधना पूर्ण केली. त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून तत्कालीन स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा केली. वास्तवता आणि कलात्मकता हा त्यांच्या लेखनाचा गुण आहे.

त्यांनी पणजी, आजी आणि स्वतः अशा तीन पिढ्यांचा शोध आपल्या कादंबरीतून अधोरेखित केलेला आहे.

**संदर्भ** :


- केळकर मृणालिनी : भारतीय साहित्यरत्ने, चैतन्य साहित्य, नागपूर. डिसेंबर २००७ प्रथम आवृत्ती.
- जोशी मिलींद : चरित्र अशी घडतात, पुणे : अनुबंध प्रकाशन, २००६
- मेनन सुधा : आघाडीचे मधील नेतृत्व फेब्रुवारी २०/४, कोल्हापूर मेहता पब्लिशिंग हाऊस,
- ई - संसाधने http://maharashtranayak.in
  https://hi.wikipedia.org